पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर – ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: bcudspecialcell@sus.ac.in, registrar@sus.ac.in

NAAC Accredited-2022 'B'++ Grade (CGPA 2.96)



विशेष कक्ष विभाग **Special Cell Section**

परिपत्रक

विषय : नियमित आस्थापनावरील कार्यरत कर्मचारी यांना पुढील शिक्षणासाठी कार्यालयीन वेळेत सवलत देण्याबाबत...

संदर्भ : दि.२२/१०/२०२६ रोजीच्या विशेष कक्ष स्थायी समितीच्या बैठकीतील ठराव क्र.३.४

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व नियमित आस्थापनावरील कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, कर्मचाऱ्यांना पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने विशेष कक्ष स्थायी समितीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.

ठराव क्र.3.4	शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पुढील शिक्षणासाठी विद्यापीठामध्ये प्रवेश घेणार असल्यास त्यांना, कार्यालयीन वेळेमध्ये शिक्षण घेता येईल, त्यासाठी त्यांनी जेवढा शिक्षणासाठी कार्यालयीन वेळ देण्यात येईल तेवढा वेळ सकाळच्या सत्रामध्ये किंवा सांयकाळच्या सत्रामध्ये कार्यालयामध्ये जादा काम करुन शिक्षण पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याबाबत विशेष कक्ष विभागाने परिपत्रक निर्गमित करुन सर्व माहिती आस्थापना विभागाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. याबाबतची सर्व कार्यवाही आस्थापना विभागाने करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

या ठरावानुसार पुढील शिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या सर्व नियमित कर्मचाऱ्यांनी शिक्षणात प्रवेश घेण्याबाबत विद्यापीठाने संधी प्रदान केलेली आहे. तरी याबाबत पुढील कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करण्यात येणार आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित,

(डॉ. अतुल लकडे)
प्र.कुलसचिव

जा.क्र. पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२६/ 10174 **दिनांक :** - 7 NOV 2026

प्रति,
सर्व नियमित प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.